महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २३३ वा | दिनांक : ११/०७/२०२५ | वार : शुक्रवार

## 'बामू'च्या उपकुलसचिवांचा आत्महत्येचा प्रयत्न:विधान परिषदेत उपस्थित झाला मुद्दा



**मुंबई :** छत्रपती संभाजीनगर येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या उपकुलसचिव हेमलता ठाकरे यांनी आत्महत्येचा प्रयत्न केल्यामुळे एकच खळबळ माजली आहे. विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी हा मुद्दा आज गुरूवारी सभागृहात उपस्थित केला. त्यावर राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी या प्रकरणाच्या चौकशीसाटी सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या नेतृत्वात एक चौकशी स्थापन करण्याची घोषणा केली आहे.

अंबादास दानवे हा मुद्दा विधान परिषदेत मांडताना म्हणाले की, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाच्या उपकुलसचिव हेमलता ठाकरे यांची एक सुसाईड नोट समोर आली आहे. त्यांनी झोपेच्या गोळ्या खाऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी आपल्या सुसाईड नोटमध्ये विद्यापीठाचे कुलगुरू विजय फुलारी व कुलसचिव प्रशांत अमृतकर यांच्यावर मानसिक छळ केल्याचा थेट आरोप केला आहे. त्यांनी वरिष्ठ व पोलिसांकडे तक्रार केली. पण कुठेही त्यांना दाद मिळाली नाही. एखाद्या उपकुलसचिवाचा अशा पद्धतीचा छळ होत असेल तर काय बोलावे? कारण, सातत्याने वेगवेगळ्या छळाच्या घटना पुढे येत आहेत.

महिला अधिकाऱ्याची सुसाईड नोटमध्ये पाहिली तर ती अतिशय गंभीर आहे. महिला सुरक्षेचा प्रश्न या प्रकरणी उपस्थित होत आहे. छोट्या ऑफिसमध्ये सोडा, मोठ्या विद्यापीठाच्या उपकुलसचिव दर्जाच्या महिला अधिकाऱ्याला अशा प्रकारे आत्महत्येस प्रवृत्त केले जात असेल तर ती आपल्यासाठी शोभनीय गोष्ट नाही. त्यामुळे मी मुद्दाम आपल्याला २८९ ची सूचना दिली आहे.

उच्चपदस्थ महिला अधिकारी वरिष्ठांच्या जाचाला कंटाळून अशा प्रकारे आत्महत्येचा प्रयत्न करत असतील तर गंभीर आहे. मला कुलगुरू व कुलसचिव यांच्यावर कशी कारवाई करतात त्याची प्रक्रिया मला ज्ञात नाही. पण एवढ्या मोठ्या पदावर असतानाही महिला सुरक्षित आहेत का? यावर आपल्याला विचार करण्याची गरज आहे. यावर सांगोपांग चर्चा झाली असती तर त्यातून खूप काही चांगले बाहेर आले असते. पण तुम्ही आमची सूचना नाकारली. चंद्रकांत पाटील हे निश्चितपणे संवेदनशील मंत्री आहेत. अशा विषयाचा ते कोणत्याही प्रकारचा मुलाहिजा न ठेवता कारवाई करतील अशी मला अपेक्षा आहे, असे अंबादास दानवे म्हणाले.

त्यावर राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी ही अतिशय गंभीर घटना असल्याचे मान्य केले. ही अतिशय गंभीर प्रकारची घटना आहे. सकाळपासून या विषयाची माहिती उपलब्ध करून घेतली. ह्या ज्या उपकुलसचिव हेमलता ठाकरे आहेत, त्यांच्या संदर्भात केवळ विद्यापीठ नाही तर राज्यपालांपर्यंत तक्रार गेली. राज्यपालांनी त्यांची तातडीने चौकशी करण्याचे सांगितल्यानंतर पुष्पा गायकवाड यांच्या नेतृत्वात एक समिती नियुक्त करण्यात आली. त्यांनी सुद्धा सीसीटीव्ही पाहून त्यांना दोषी ठरवले. त्यामुळे स्वाभाविकपणे अशा प्रकारचे दोषारोपण होते तेव्हा आपली बाजू मांडण्यासाठी एक नोटीस काढतो. ती नोटीस मिळाल्यानंतर त्यावर त्यांनी उत्तर दिले होते असा हा घटनाक्रम आहे.

त्यानंतरही घटना खूप गंभीर आहे. त्यामुळे सेवानिवृत्त न्यायाधीश पी एस परांजपे यांची समिती स्थापन केली आहे. या प्रकरणात आपल्याला तातडीने कुणावरही निलंबनाची कारवाई करता येत नाही. कारण, राज्यपालांच्या अधिकारांमध्ये हे सर्व असतात. पण राज्यपालांचा स्वतः यात समावेश आहे. त्यांनी या प्रकरणी चौकशीचे आदेश दिले होते. त्यामुळे विभागीय चौकशी अधिकारी पी एस परांजपे यांचा रिपोर्ट येईल त्यानुसार कारवाई केली जाईल, असे चंद्रकांत पाटील यांनी स्पष्ट केले.

## कॉमेडियन कपिल शर्माच्या कॅफेवर गोळीबार




**सरे :** बुधवारी रात्री कॅनडातील ब्रिटिश कोलंबियातील सरे येथील कॉमेडियन कपिल शर्माच्या कॅफेवर हल्ला झाला. कपिल शर्माने तीन दिवसांपूर्वी, ७ जुलै रोजी कॅप्स कॅफे नावाच्या या कॅफेचे उद्घाटन केले होते. मीडिया रिपोर्ट्सनुसार, हल्लेखोरांनी कॅफेवर ९ राउंड गोळीबार केला.

एनडीटीव्हीच्या वृत्तानुसार, खलिस्तानी दहशतवादी हरजीत सिंग लाडीने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. हरजीत सिंग हा राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) यादीतील मोस्ट वॉन्टेड दहशतवाद्यांपैकी एक आहे आणि तो बब्बर खालसा इंटरनॅशनलशी संबंधित आहे.

हल्लेखोराने गोळीबाराचा व्हिडिओही बनवला, जो सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे. यामध्ये कॅफेच्या बाहेर कारमध्ये बसलेला एक व्यक्ती कारच्या आतून सतत गोळीबार करताना दिसत आहे. तथापि, या घटनेत अद्याप कोणीही जखमी झाल्याचे वृत्त नाही.

गोळीबारानंतर पोलिस आणि फॉरेन्सिक पथके घटनास्थळी पोहोचली असून तपास करत आहेत. कपिल शर्माच्या जुन्या वक्तव्यामुळे संतप्त झालेल्या हरजीत सिंग लाडीने त्याच्या कॅफेमध्ये गोळीबाराची घटना घडवून आणल्याचे सांगण्यात येत आहे.

विश्व हिंदू परिषद (VHP) नेते विकास प्रभाकर उर्फ विकास बग्गा यांच्या हत्येप्रकरणी NIA हरजीत सिंग लाडी यांचा शोध घेत आहे. एप्रिल २०२४ मध्ये पंजाबमधील रूपनगर जिल्ह्यात त्यांच्या दुकानात VHP नेत्याची गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती.

यापूर्वी १ सप्टेंबर २०२४ रोजी रात्री कॅनडातील व्हँकुव्हर येथे पंजाबी गायक एपी ढिल्लन यांच्या घराबाहेर गोळीबार झाला होता. याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता, ज्यामध्ये एक व्यक्ती ढिल्लन यांच्या घराबाहेर १४ गोळ्या झाडताना दिसत होता.

या हल्ल्याची जबाबदारी लॉरेन्स बिश्नोई आणि रोहित गोदारा टोळीने घेतली होती. व्हिडिओमध्ये ढिल्लनने सलमान खानसोबत 'ओल्ड मनी' या म्युझिक व्हिडिओमध्ये काम केल्याचे कारण हल्ल्याचे कारण असल्याचे सांगण्यात आले होते. ढिल्लनने सलमान खानपासून अंतर ठेवावे, अन्यथा त्याला गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल अशी धमकी या टोळीने सोशल मीडियावर दिली होती.

## शाळेची मान्यता रद्द झाली तरी मुलांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये - रूपाली चाकणकर

**मुंबई :** शहापूरच्या शाळेत घडलेल्या आक्षेपार्ह प्रकारानंतर शाळेची मान्यता रद्द करण्याची कारवाई शिक्षण विभाग करेल मात्र यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षण विभागाने तातडीने कार्यवाही सुरू करावी. तसेच पोलिसांनी पालकांना विश्वासात घेऊन सखोल तपास करावा असे निर्देश राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी दिले आहेत.

शहापूरच्या शाळेत स्वच्छतागृहात मासिक पाळीचे रक्त आढळल्याने मुख्याध्यापिकांनी महिला सफाईगारामार्फत सर्व मुलींची आक्षेपार्ह शारीरिक तपासणी केली. राज्य महिला आयोगाने या प्रकरणाची दखल घेतली असून राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी आज शहापूर मध्ये पालकांची भेट घेतली. त्यानंतर शिक्षण विभागाचे अधिकारी आणि पोलिस ठाण्यात जाऊन आतापर्यंतच्या तपासाची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली.

पालकांचे म्हणणे तसेच शिक्षण विभाग, पोलिस तपासाचा आढावा घेतल्यानंतर श्रीमती चाकणकर म्हणाल्या, शिक्षणाधिकारी यांनी शाळेची तपासणी केल्यानंतर शाळेत तक्रार निवारण समिती नसणे, सखी सावित्री समिती केवळ रजिस्टर नोंद असणे अशा अनेक गंभीर बाबी समोर आल्या आहेत. या गंभीर घटनेतील आरोपी मुख्याध्यापिका यांना निलंबित करण्यात आले आहे. तपासणी नंतर शिक्षणाधिकारी यांनी शाळेची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव शिक्षण विभागाला पाठविण्यात आला आहे. मात्र मान्यता रद्द झाल्याने मुलांचे शैक्षणिक नुकसान होऊ शकते. तेव्हा सोमवार पासून स्वतंत्रपणे पुन्हा शाळा सुरू करणेबाबत कार्यवाही करावी अशा सूचना शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

पोलिस आढावा बैठकीत, 8 जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून 5 जण अटकेत आहेत. त्यांना 15 तारखेपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. उर्वरित 3 जणांची पोलिस चौकशी करण्यात येत आहे असे पोलिसांनी सांगितले. दोन विश्वस्त यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र इतर दोन विश्वस्त यांनाही आरोपी करण्याची मागणी करत पालकांनी या आधी घडलेल्या काही घटना सांगितल्या आहेत. याबाबत उद्याच पोलिस, पालक, शिक्षण विभाग यांची बैठक घेऊन पालकांच्या तक्रारी जाणून घेत सखोल तपास करावा, अशा सूचना रूपाली चाकणकर यांनी पोलिसांना दिल्या आहेत. याप्रकरणी तपास जलद गतीने पूर्ण करत दोषारोपपत्र दाखल करण्याचे ही निर्देश त्यांनी दिले.

अपमानजनक शारीरिक तपासणीला सामोरे गेलेल्या मुलींच्या मानसिकतेचा विचार करून सर्व मुलींचे बाल कल्याण समितीकडून समुपदेशन करण्यात यावे, असेही चाकणकर यांनी प्रशासनास सांगितले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ११ जुलै २०२५


## इक़रा पब्लिक शाळेचे २ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीत झळकले




**जळगाव :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे यांच्या मार्फत फेब्रुवारी-२०२५ रोजी घेतलेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती (इयत्ता आठवी) परीक्षेत इकरा पब्लिक शाळेतील आठवीचे २ विद्यार्थी शिष्यवृत्ती मिळवून गुणवत्ता यादीत झळकले आहेत.सेमी इंग्रजी माध्यमाचे आठवीचे विद्यार्थी अरहम अमीन देशपांडे व शाफिया शेख तनवीर यांनी उत्तम गुण मिळवून गुणवत्ता यादीत येण्याचा मान पटकावला आहे परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव संस्थेचे अध्यक्ष डॉ. करीम सालार यांच्या हस्ते करण्यात आला.सर्व स्तरांतील मान्यवरांकडून अरहम देशपांडे व शाफिया कौसर ला पुढील शैक्षणिक वाटचाली साठी अनेक शुभेच्छा देण्यात आल्या. संस्थेचे सचिव एजाज़ मलिक,उपाध्यक्ष डॉ. इक़बाल शाह, मुख्याध्यापक शेख शकील व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थीचे कौतुक केले

## गुरूपौर्णिमेच्या औचित्याने जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत "गुरू सन्मान सोहळा"



**धोत्रा :** गुरूपौर्णिमेच्या औचित्याने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धोत्रा येथे मोठ्या उत्साहात "गुरू सन्मान सोहळा" संपन्न झाला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूजनांना फुलांचे पुष्पगुच्छ व हस्तनिर्मित शुभेच्छापत्रे भेटवस्तूंनी सन्मानित केले. या प्रसंगी अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूंप्रती कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री जाधव सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे शिक्षक श्री सोन्ने सर, श्री चव्हाण सर,श्रीमती बोर्डे मॅडम श्रीमती सोर मॅडम होते शिक्षकांनीही आपल्या अनुभवातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर विचार मांडले. या सन्मान सोहळ्याचे आयोजन शिक्षिका श्रीमती सरला कामे व शाळेच्या सातवी वर्गानर परिश्रमपूर्वक केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांसोबत सामूहिक छायाचित्र काढून हा खास दिवस संस्मरणीय केला.गुरूपौर्णिमा ही भारतीय संस्कृतीतील एक महत्वाची परंपरा असून, शाळेने ती अभिमानाने जपली हे विशेष. अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थी-शिक्षक यांच्यातील बंध आणखी दृढ होतो हे या उपक्रमातून अधोरेखित झाले.

## तुकडाबंदी कायदा रद्द करण्याचा निर्णय स्वागतार्ह - डॉ.हुलगेश चलवादी



**पुणे :** तुकडाबंदी कायदा रद्द करण्याची घोषणा राज्याच्या महसूल मंत्र्यांनी विधानसभेत केली.शहरी भागात गुंठ्यात जमीन खरेदी-विक्रीसाठी ७८ वर्षांपूर्वी केलेला हा कायदा डोकेदुखी ठरत होता.वर्षाच्या सुरुवातीलाच हा कायदा रद्द करण्याची मागणी बहुजन समाज पक्षाने केली होती. कायदा रद्द करण्याच्या दिशेने सरकारने टाकलेले पाऊल स्वागतार्ह आहे, असे प्रतिपादन पक्षाचे प्रदेश महासचिव, पश्चिम महाराष्ट्र झोन प्रभारी डॉ. हुलगेश चलवादी यांनी गुरुवारी (ता.१०) केले.

राज्यातील जमीन खरेदी-विक्रीसंबंधीचे सरकारी धोरण आतापर्यंत बिल्डरांसाठी पोषक आणि गरीब; मध्यमवर्गीयांसाठी मारक होते. सर्वसामान्यांना त्यांचे स्वप्नातील घर बांधता यावीत याकरिता शहर, उपनगरांमध्ये गुंठे खरेदी-विक्री नियमांत बदल काळाची गरज होती. केवळ विकासकांना लाभ पोहोचवणारी, त्यांच्या सदनिका विक्रीत वाढ करण्यासाठी विद्यमान प्रक्रिया कार्यान्वित होती, असा आरोप डॉ.चलवादी यांनी केला.

राज्यातील तब्बल ५० लाखांहून अधिक नागरिकांना कायदा रद्द करण्यात आल्याने फायदा होईल. सरकारने १२ जुलै २०२१ च्या परिपत्रकानुसार एक, दोन, तीन अशा गुंठ्यांमध्ये शेतजमीन खरेदी विक्री करण्यावर निर्बंध घातले होते. परंतु, तीव्र विरोधानंतर यात सुधारणा करीत जिरायत जमिनीसाठी २० गुंठे, तर बागायत जमिनीसाठी ११ गुंठे अशी मर्यादा ठरविली होती. मात्र, आता हा कायदाच रद्द करण्यात येणार असल्याने शहरी भागात १ गुंठा जमीन खरेदी-विक्रीची मुभा मिळेल, असे डॉ.चलवादी यांनी स्पष्ट केले.

कुठलाही सर्वसामान्य व्यक्ती ११ गुंठे जमीन खरेदी करून शकत नाही. गुंठे-दोन गुंठे जमीन घेवून ही मंडळी आपल्या स्वप्नातील घर बांधतात. परंतु, तुकडाबंदी कायद्यामुळे खरेदी-विक्री व्यवहार सुरु असले तरी जमिनीचे तुकडे नियमित होत नव्हते. अशात 'पॉवर ऑफ अटर्नी' अथवा 'करारनामा' करीत जमीन खरेदी करण्याशिवाय कुठला पर्याय सर्वसामान्यांसमोर उरत नसत. या प्रक्रियेमुळे खरेदीदाराचे सात बाऱ्यावर नाव चढत नव्हते. जमीनदार याचा फायदा घेत एकच जमीन अनेकांना विक्री करीत त्याची फसवणूक करायचे.अशा प्रकारातून आता नागरिकांची सुटका होईल, असा विश्वास डॉ.चलवादी यांनी व्यक्त केला.

## मनपा शाळेत गुरुपौर्णिमा हा कार्यक्रम संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा शाळा चिकलठाणा या शाळेत गुरुपौर्णिमा हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक श्री शिंदे सर हे होते. इ ५ वी ते १० वी तील मुलांनी भाषण केले. तसेच श्रीम. भिंगोले मॅडम यांनी मुलांना आजच्या दिवसाचे महत्व सांगितले. शाळेतील सर्व शिक्षकवर्ग उपस्थित होते.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ११ जुलै २०२५

## पुण्यात पत्नीच्या प्रेमसंबंधांमुळे पतीची आत्महत्या

**पुणे :** पत्नी आणि तिचा मित्र वेगवेगळ्या कारणावरुन सतत त्रास देत असल्याने एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना नाना पेठेत घडली आहे. या तरुणाला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पत्नीसह तिच्या मित्राविरुद्ध समर्थ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अतुल मारुती कदम (वय -३९, रा. बालाजी कॉम्प्लेक्स, पिंपरी चौक, नाना पेठ,पुणे) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. त्याला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पत्नी सोनाली अतुल कदम (वय- ३१, रा. साडेसतरानळी, हडपसर, पुणे), तसेच तिचा मित्र कृष्णा शिंदे (रा. हडपसर, पुणे) यांच्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत अतुल याची आई माधुरी मारुती कदम (वय ६१) यांनी समर्थ पोलिस ठाण्यात आरोपी विरोधात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अतुल आणि सोनाली यांचा सन २०१५ मध्ये विवाह झाला होता. विवाहानंतर त्यांच्यात कौटुंबिक कारणावरुन सातत्याने वाद सुरू होते. दरम्यान, अतुलला पत्नी सोनाली हिचे कृष्णा शिंदे याच्याशी जवळचे मैत्री संबंध असल्याचे समजल्याने त्यांच्यातील वाद विकोपाला गेले होते. त्यावरुन त्यांच्यात मागील काही दिवसांत वाद वाढले होते. या वादामुळे सोनाली देखील वेगळी राहायला माहेरी निघून गेली होती. परंतु त्यानंतर सोनाली आणि तिचा मित्र कृष्णा यांनी अतुलला त्रास देण्यास सुरुवात केली. त्याच्या मोबाइलवर फोन करुन त्यास सतत धमकाविण्यात येत होते.

पत्नी आणि तिच्या मित्राच्या त्रासामुळे अतुल यांनी मागील महिन्यात १५ जून रोजी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. पोलिसांनी याबाबत चौकशी केल्यावर पत्नी आणि तिच्या मित्राने दिलेल्या त्रासामुळे मुलगा अतुलने आत्महत्या केल्याचे आई माधुरी यांनी दिलेल्या फिर्यादीत सांगितल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक एस शेंडगे पुढील तपास करत आहेत.

## मोबाईल स्टेटस ठेवल्या वरुन भाऊ रागावला : बहिणीची आत्महत्या



**सातारा :** घरात न सांगता फिरायला गेलीस, स्टेट्स ठेवलंस म्हणत भाऊ रागावल्यानं बहिणीने विषारी औषध पिऊन आत्महत्या केल्याची घटना सोमवारी सायंकाळी साताऱ्यात घडली. मातम्मा भीमाशंकर शिंगे (वय २१, सध्या रा. लक्ष्मी टेकडी, सदर बझार सातारा, मूळ रा. कर्नाटक), असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव आहे. दरम्यान, या घटनेनंतर भावानेही विषारी खडू खाऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. त्याच्यावर क्रांतिसिंह नाना पाटील जिल्हा सर्वसाधारण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मातम्मा शिंगे ही तरूणी सोमवारी घरात काहीही न सांगता आपल्या मैत्रिणींसोबत कास परिसरात फिरायला गेली होती. त्याठिकाणचे फोटो तिने मोबाईल स्टेट्सला ठेवले. ते भावाने पाहिले. घरात न सांगता गेलीस आणि स्टेटसला फोटो ठेवलेस म्हणत भाऊ रागावला. भाऊ रागावल्याचे सहन न झाल्याने रागाच्या भरात तिने विषारी औषध प्राशन केले. मूळचे कर्नाटकातील असलेले शिंगे कुटुंब कामानिमित्त साताऱ्यातील सदर बझारमध्ये लक्ष्मी टेकडी परिसरात स्थायिक आहे.

मुलीने विषारी औषध पिल्याचे लक्षात येताच कुटुंबीयांनी तिला खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचार सुरू असताना तिचा मृत्यू झाला. बहिणीने टोकाचं पाऊल उचलल्याचं सहन न झाल्याने भावाने देखील विषारी खडू खाऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. त्याला तातडीने क्रांतिसिंह नाना पाटील जिल्हा सर्वसाधारण रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याची प्रकृती सध्या स्थिर आहे. सातारा शहर पोलीस ठाण्यात या दोन्ही घटनांची नोंद झाली असून पोलीस उपनिरीक्षक अनिल जायपत्रे हे अधिक तपास करत आहेत.

अशीच एक घटना ३० जून रोजी साताऱ्यात घडली होती. आपली मैत्रिण दुसऱ्या मुलाबरोबर फिरताना दिसल्यानं अल्पवयीन मुलानं गळफास घेऊन आत्महत्या केली होती.

## कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात, 'गुरूपौर्णिमा' उत्साहात साजरी





**शिरूर (का.)** दि.१० जुलै २०२५ गुरूवार रोजी, शिरूर (कासार) जि.बीड येथील कालिकादेवी माध्यमिक विद्यालयात,'गुरूपौर्णिमा' उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्राचार्य केशव भांगे साहेब,यांच्या हस्ते,'आदर्श शिक्षण संस्थेच्या संस्थापिका लोकनेत्या स्व.केशरबाई (काकू) क्षीरसागर व लोकनेते स्व.सोनाजीराव (नाना) क्षीरसागर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून विनम्रपणे गुरूवंदन करण्यात आले.या प्रसंगी प्राचार्य केशव भांगे साहेबांनी आपल्या भाषणातून,'गुरूपौर्णिमा' हा दिवस भारतीय परंपरेतील विशेष मानला जातो.या दिवशी आपण निवडलेल्या गुरूजनांचा अथवा शिक्षकांचा सन्मान करण्यासाठी ही गुरूपौर्णिमा साजरी केली जाते,गुरू म्हणजे ज्ञानाचा उगम, व अखंड वाहणारा झरा, गुरू म्हणजे निष्ठा,कर्तव्य आणि गुरू म्हणजे निस्सीम श्रध्दा,भक्ती,आदर्शाचे मूर्तिमंत प्रतिक होय,असे गुरूंचे महात्मे आपल्या मनोगतातून वर्णन केले. चि. शोयब आतार, या विद्यार्थ्यांनेही मनोगतातून गुरूजनांबद्दल कृतज्ञपूर्वक भावना व्यक्त केल्या. तर कु. पुजा काळे, आकांक्षा खेडकर, चि. समर्थ दुधाळ, आशय बडे या विद्यार्थ्यांनी गुरूवर्यांना गुलाबाचे फुल देऊन वंदन केले. यावेळी उपप्राचार्य बसवेश्वर देशमाने, उपमुख्याद्यापक प्रकाश राठोड, पर्यवेक्षक जनार्दन काळे, प्रा. महारूद्र डोंगरे, परीक्षा विभाग प्रमुख प्रा.नामदेव तरकसे,प्रा.नारायण घोलप, प्रा. अशोक इनकर, प्रा. संजय काकडे, प्रा. प्रशांत मळेकर, प्रा. अनिल जरे, प्रा.बिभिषण घायाळ,प्रा.महादेव हांगे,प्रा.घनश्याम चव्हाण, प्रा. नारायण तांबे, प्रा. लक्ष्मण गव्हाणे, प्रा. दत्ता शिंदे, डॉ. आत्माराम झिंजुर्डे, डॉ. सत्यनारायण ढवळे, प्रा. दत्ता गायकवाड,प्रा.विश्वास ढाकणे,प्रा.अशोक सवासे, प्रा. सुनिल मोरे, प्रा. शशिकांत जावळे,प्रा.हनुमंत घायाळ, डॉ. अशोक घोडके,प्रा.बाळासाहेब खटाणे, प्रा. अमर खोले, प्रा. अक्षय रणखांब,प्रा.सविता दराडे, प्रा.रेखा निर्मळ प्रा.सिमा ढवळे, श्रीमती अनिता लाटे मॅडम, आबासाहेब ढवळे, रविंद्र बडे,बाळासाहेब येवले,वसंत आहेर,राजू बडे, आप्पासाहेब कांबळे, नितीन बहिर, रोहित शिराळे, प्रशांत राऊत, रविंद्र गव्हाणे, सुंदर शिंदे, अक्षय साळवे, जितेश उगलमुगले, आदिनाथ काशिद,सुनिल खेडकर, विलास कांबळे, गौतम भोसले, इत्यादिंची उपस्थिती होती .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विनोद गलांडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन जयेंद्र निकम यांनी केले. विद्यालयातील सर्व कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ११ जुलै २०२५

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात यशवंत विद्यार्थी योजनेत भ्रष्टाचार : मंत्री अतुल सावे



**छत्रपती संभाजीनगर** : राज्य सरकारने धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी "श्रीमंत राजे यशवंतराव होळकर विद्यार्थी विकास योजना" सुरू केली आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबवली जाणारी ही योजना अत्यंत महत्त्वाकांक्षी असून, गरजू विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिक्षण देण्यासोबतच वसतिगृहाचीही सुविधा दिली जाते. या योजनेअंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याच्या शिक्षणासाठी दरवर्षी सुमारे ७० हजार रुपये खर्च केला जातो.

मात्र, या योजनेत मोठ्या गैरव्यवहाराचा प्रकार समोर आला आहे. अनेक ठिकाणी ना विद्यार्थी आहेत, ना वसतिगृहे, तरीही अनुदानाची रक्कम उचलण्यात आली आहे. विशेष म्हणजे हा घोटाळा इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या जिल्ह्यातच उघडकीस आला आहे. या गैरव्यवहाराचे धक्कादायक वास्तव समोर आले असून, आता मंत्री अतुल सावे यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे.

या संदर्भात बोलताना मंत्री अतुल सावे म्हणाले, आमच्या विभागाच्या माध्यमातून धनगर समाजातील विद्यार्थ्यांना इंग्रजी शाळेच्या माध्यमातून चांगले शिक्षण मिळावे, म्हणून आम्ही १०० विद्यार्थ्यांना सक्षम करत असतो. मात्र, ज्या शाळांमध्ये सुविधा द्यायला पाहिजे, त्या देत नसतील तर त्यांच्यावर आम्ही कडक कारवाई करु आणि त्यांची मान्यता रद्द करु. ज्या अधिकाऱ्यांनी यासंदर्भात योग्य आणि वेळेवर रिपोर्टिंग आम्हाला दिले नाही तर अशा अधिकाऱ्यांवर देखील कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा सावे यांनी दिला आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आसेगाव येथील स्वामी विवेकानंद ग्लोबल स्कूल या संस्थेला १०० विद्यार्थ्यांसाठी मान्यता देण्यात आली होती. मात्र प्रत्यक्ष पाहणीदरम्यान, शाळेत एकही विद्यार्थी उपस्थित आढळला नाही. वसतिगृह अस्तित्वात नव्हतेच. संगणक बंद अवस्थेत होते, खोलीत गोंधळ होता आणि सर्व व्यवहार फक्त कागदावरच सुरू असल्याचे स्पष्टपणे दिसून आले. विशेष म्हणजे, संस्थाचालकाने स्वतःच मागील वर्षी या योजनेअंतर्गत अनुदान मिळाल्याची कबुली दिली.

दुसऱ्या प्रकरणात, गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूलमध्ये सायंकाळी ७.३० वाजता भेट दिल्यानंतरही तिथे ना विद्यार्थी होते, ना वसतिगृह. तरीदेखील या शाळेला १०० विद्यार्थ्यांसाठी मान्यता मिळालेली असून, त्यानुसार शासकीय निधीही उचललेला आहे. या प्रकारावरून हे स्पष्ट होते की श्रीमंत राजे यशवंतराव होळकर विद्यार्थी विकास योजना प्रत्यक्षात न राबवता केवळ कागदोपत्री दाखवून सरकारी निधीचा गैरवापर केला जात आहे. हा प्रकार केवळ अनुदान लुटण्यापुरता र्यादित नसून, तो गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या हक्काशी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासोबत खेळ करणारा गंभीर गुन्हा आहे.

सध्या मंत्री अतुल सावे यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. मात्र, आता खरा प्रश्न असा आहे की यावर नेमकी कारवाई कधी आणि कशी होणार? हे पाहणे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

## राज ठाकरेंची तोफ मीरा भाईंदरमध्ये धडाडणार! : अविनाश जाधव

**मुंबई** : मीरा भाईंदर येथे ८ जुलै रोजी मनसे व शिवसैनिकांनी मोर्चा काढला होता. यावेळी मनसे नेते अविनाश जाधव यांना पोलिसांनी काही वेळासाठी अटक देखील केली होती. मोर्चाला परवानगी नसल्याने अनेक कार्यकर्त्यांना देखील यावेळी पोलिसांनी ताब्यात घेतले होते. परंतु, मराठी जनतेचा व कार्यकर्त्यांची आक्रमक भूमिका पाहता मोर्चाला परवानगी देण्यात आली होती. आता १८ जुलै रोजी राज ठाकरे मीरा भाईंदर येथे सभा घेणार असल्याचे समजते. अविनाश जाधव यांनी त्यांच्या फेसबुक पेजवर याची माहिती दिली आहे.मराठी भाषा बोलण्याच्या मुद्द्यावरून मनसे कार्यकर्त्यांनी एका हिंदी भाषिक व्यापाऱ्याला मारहाण केली होती. त्याच्या निषेधार्थ अमराठी व्यापाऱ्यांनी मोर्चा काढला होता. त्याला उत्तर म्हणून मंगळवारी ८ जुलै रोजी मनसे व मराठी जनतेने भव्य मोर्चा काढला होता. यात शिवसेना ठाकरे गटाचे देखील कार्यकर्ते सामील झाले होते. आता मीरा भाईंदर येथील मराठी जनतेचे आभार मानायला राज ठाकरे सभा घेणार असल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, मनसेने काढलेल्या या मोर्चाला परवानगी नसल्याने पोलिसांनी कार्यकर्त्यांना ताब्यात घेणे सुरू केले. पोलिसांच्या या भूमिकेला विरोध करत कार्यकर्त्यांनी आंदोलन सुरूच ठेवले व अखेर पोलिसांनी या मोर्चाला परवानगी दिली. मनसेचे ठाणे पालघर जिल्हा अध्यक्ष अविनाश जाधव यांना मोर्चाच्या एक दिवस आधी मध्यरात्री पोलिसांनी ताब्यात घेतले होते. यानंतर मोर्चाला परवानगी दिल्याने अविनाश जाधव यांची सुटका करण्यात आली. त्यांची सुटका झाल्यानंतर मनसे नेते संदीप देशपांडे, नितीन सरदेसाई, अविनाश जाधव, ठाकरे गटाचे माजी खासदार राजन विचारे यांनी मीरा-भाईंदर येथे मोर्चाला संबोधित करत जोरदार भाषणे केली.

मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी त्यांच्या सोशल मीडियावरून सर्व नेते व कार्यकर्त्यांना सूचना केल्या आहेत. सर्व कार्यकर्ते आणि प्रवक्त्यांना प्रसारमाध्यमांशी कोणत्याही पद्धतीचा संवाद न साधण्याचे स्पष्ट आदेश दिले. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला होता. मात्र असे असताना आता शुक्रवार, १८ जुलै रोजी राज ठाकरे हे मीरा-भाईंदर मध्ये येणार असल्याची माहिती अविनाश जाधव यांनी आपल्या समाज माध्यमांवरून दिली आहे.

## शेतकरी प्रश्नांवरून आशिष जैस्वाल-नाना पटोलेंमध्ये जुंपली



**मुंबई** : शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून काँग्रेसचे आमदार नाना पटोले आणि राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांच्यात सभागृहात खडाजंगी झाल्याचे पाहायला मिळाले. धान उत्पादक शेतकऱ्यांच्या बोनसवरून नाना पटोले आणि मंत्री आशिष जैस्वाल यांच्यात तू तू मैं मैं झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मध्यस्थी केली. तसेच मंत्र्यांना संरक्षण द्यावे आणि नाना पटोले यांना समज द्यावी, अशी मागणी शिंदेंनी विधानसभा अध्यक्षांकडे केली.

राज्यमंत्री आशिष जैस्वाल हे धान उत्पादक शेतकऱ्यांच्या बोनसवरील प्रश्नाला विधानसभेच्या सभागृहात उत्तर देत होते. विरोधी पक्ष कमकुवत असला तरी, सरकार शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. सरकार शेतकऱ्याच्या मागे कालही उभे होते, आजही आहे आणि उद्याही राहील, असे आशिष जैस्वाल म्हणाले. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सरकारकडून झालेल्या मदतीमुळे विधानसभा निवडणुकीत तुमची अशी अवस्था झाली, हे लक्षात घ्या, अशी टीका राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांनी विरोधकांवर केली. यावेळी आशिष जैस्वाल यांनी नाना पटोले यांचे नाव घेतले. त्यानंतर नाना पटोले आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. यावर महाराष्ट्राच्या जनतेला खरी वस्तुस्थिती जाऊ नये, यासाठी अशा पद्धतीने व्यत्यय आणण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप आशिष जैस्वाल यांनी नाना पटोलेंवर केला.

नाना पटोले बोलायला उभे राहिल्यानंतर आधी मंत्र्यांचे उत्तर पूर्ण होऊ असे विधानसभा अध्यक्षांनी त्यांना सांगितले. पण त्यांनी माझे नाव घेतले असे म्हणत नाना पटोले आक्रमक झाले. त्यावर नाव घेतले तर काय झाले? मी काही चुकीचे किंवा आक्षेपार्ह बोललो नाही. मी सन्माननीय नानाभाऊ पटोले म्हटले, असे मंत्री जैस्वाल म्हणाले. त्यानंतर नानाभाऊ तुमचे नाव हरकतास्पद नाहीये हे मी घोषित करतो, असे विधानसभा अध्यक्ष राहुल रार्वेकर नाना पटोलेंना म्हणाले. यानंतर एकनाथ शिंदे यांनी मध्यस्थी केली.

शेतकऱ्यांच्या विषयावर मंत्री उत्तर देत असताना त्यांचे उत्तर ऐकले पाहिजे. तुमचे सर्व भाषण त्यांनी पूर्ण ऐकले. तुम्ही स्वत: ला शेतकऱ्यांचे नेते म्हणून संबोधता. त्यामुळे तुम्ही मंत्र्यांचे सर्व उत्तर ऐकले पाहिजे, असा सल्ला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नाना पटोले यांना दिला. मंत्री आशिष जैस्वाल यांना संरक्षण द्या आणि नाना पटोले यांना समज द्या, अशी विनंती एकनाथ शिंदे यांनी सभागृहाचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे केली

